पनवेल (प्रतिनिधी) लोकप्रिय व कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून गरीब व गरजू लोकांसाठी दरवर्षी मोफत महाआरोग्य शिबरिचे आयोजन करण्यात येते. यंदा हे शिबीर रविवार दि.०३ ऑगस्ट रोजी होणार असून या महाआरोग्य शिबीराच्या नियोजनासंदर्भातील बैठक आज खांदा कॉलनीमधील सीकेटी महाविद्यालयात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली.

यावेळी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या या महाआरोग्य शिबीराचा दहा हजारहून नागरिक लाभ घेवून उत्स्फूर्त प्रतिसाद देत असतात. आपल्या घरातील कार्य क्रम आहे असे समजून कार्यकर्ते आणि डॉक्टर शिबीर यशस्वी करण्यासाठी सहभाग घेत असतात. शिबीरास वाढती गर्दी पाहता रूग्णांना योग्य उपचार मिळावे व व्यवस्थित सेवा व्हावी, यासाठी डॉक्टरांनी दिलेल्या सल्ल्यानुसार २७ जुलैला कामोठे, कळंबोली व खारघर येथे रूग्णांची प्राथमिक तपासणी शिबीर घेण्यात येणार असून ०३ ऑगस्टला खांदा कॉलनीतील सीकेटी महाविद्यालयात अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत आरोग्य महाशिबीर होणार असल्याचे सांगून दरवर्षीप्रमाणे यंदाही हे आरोग्य महाशिबीर यशस्वी करण्यासाठी डॉक्टरर्स व कार्यकर्त्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहनही केले.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे निमित्त साधून आयोजित करण्यात येणाऱ्या या मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार महाशिबीरात नेत्र तपासणी व चष्मे वाटप, कर्णबधिरांना श्रवणयंत्र, अपगांना तीन चाकी सायकल त्याचबरोबर सर्वसाधारण रोग तपासणी, बालरोग तपासणी, महिलांचे आजार, दंतरोग तपासणी, आयुर्वेदीक व होमिओपॅथी तपासणी, ह्दयरोग तपासणी, मधुमेह तपासणी, हाडांचे रोग तपासणी तसेच औषधोपचार देण्यात येते. या शिबीराच्या नियोजनासाठी सुकाणू, स्वागत, भोजन, निमंत्रण, स्वागत, डॉक्टर व वैद्यकीय आणि रूग्ण सहाय्यक समिती, परिवहन समिती, औषध वाटप आदी विविध समितींचे गठन करण्यात आल्याची माहिती श्री.रामशेठ ठाकूर साामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष अरूणशेठ भगत आणि शहर कॉग्रेस कमिटीचे अध्यक्ष जयंत पगडे यांनी यावेळी दिली.

यावेळी शहर कॉग्रेसचे कार्याध्यक्ष व चित्रकला स्पर्धा समितीचे अध्यक्ष अरविंद सावळेकर यांनी माजी पंतप्रधान स्वर्गीय राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त पनवेल शहर कॉग्रेसच्यावतीने २० जुलै रोजी आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेची माहिती देवून यात सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन केले. ही स्पर्धा पनवेल शहर, नवीन पनवेल, खांदा कॉलनी, कामोठे, कळंबोली व खारघर अशा सहा विभागात तर चार गटांत होणार असून स्पर्धेतील विजेत्यांना विभागनिहाय व गटनिहाय स्वतंत्रपणे रोख रक्कम, स्मृती चिन्ह अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत, त्याचबरोबर प्रत्येक स्पर्धकाला सहभाग प्रमामपत्र देण्यात येणार असल्याचेही अरविंद सावळेकर यांनी आवर्जुन सांगितले.

या नियोजन बैठकीस नगराध्यक्षा चारूशिला घरत, शिक्षण सभापती एकनाथ गायकवाड, पाणी पुरवठा सभापती सुभाष भुजबळ, महिला व बाल कल्याण सभापती नीता माळी, नगरसेवक संतोष शेट्टी, गणेश पाटील, प्रकाश बिनेदार, गणपत म्हात्रे, नगरसेविका निर्मला म्हात्रे, सिता पाटील, मंगला राणे, अलका भगत, संगीता कांडपाल, पनवेल शहर कॉग्रेसचे प्रवक्ते शशिकांत बांदोडकर, पनवेल शहरा महिला अध्यक्षा वर्षा नाईक, मावळ लोकसभा युवक कॉग्रेसचे अध्यक्ष किशोर चौतमोल, अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हाध्यक्ष अमीर सय्यद, गव्हाणच्या सरपंच रत्नप्रभा घरत, डॉ.अरूणकुमार भगत, डॉ.सचिन जाधव, प्रभाकर आघारकर, राजाभाऊ दवे, काळूंद्रे विभागीय अध्यक्ष अनेष ढवळे, शिरवली विभागीय अध्यक्ष शिवाजी दुर्गे, नविन पनवेल महिला विभागीय अध्यक्षा सुशिला घरत, चंद्रकांत राणे, मनोहर मुंबईकर, माजी सरपंच कृष्णा पाटील, चाहूशेठ पोपेटा, वसंतशेठ पाटील, बशीर पटेल, एकनाथ कुंभार, सुनिल सावर्डेकर, जगदिश घरत, विलास भगत, सदानंद पाटील, अशोक मोटे, संतोष मंजुळे, अवधेश शुक्ला, गोविंद पाटील, अनिल कोळी, सचिन गायकवाड, पप्पू साळवे, बाळा जाधव, भरत जाधव, संजय जाधव, अशोक आंबेकर, मनिषा चिले, सपना पाटील, आदी पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.